# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१, अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

८३, मित्तल चेंबर्स, आठवा मजला, २२८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी :+९१ - २२ - २२८२ ८२६२ / २२०२ ८२६१

ई-मेल : mahacim.mumbai@gmail.com संकेत स्थळ : www.mcimindia.co.in


जा.क्र. एमसीआयएम/२४१२१५/२०२४ दि. ०३.१२.२०२४

## देश का प्रकृति परीक्षण अभियान

आयुर्वेदचा प्रचार–प्रसार सर्वव्यापी होण्याकरिता आयुष मंत्री, भारत सरकार मा. श्री. प्रतापराव जाधव यांची संकल्पना व मार्गदर्शनातून आयुर्वेद क्षेत्रातील संशोधना बरोबरच जनसामान्यांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने संपूर्ण देशात 'देश का प्रकृति परीक्षण' अभियान हे भारतीय चिकित्सा पद्धति राष्ट्रीय आयोग द्वारा आयोजित करण्यात येत आहे. सदरील अभियानामध्ये आयुर्वेद महाविद्यालयामध्ये पदवीचे शिक्षण घेत असलेले १,३५,००० विद्यार्थी, पदव्युत्तर शिक्षण घेत असलेले २०,००० विद्यार्थी, सदर महाविद्यालयांमधील १८,००० अध्यापक व संपूर्ण देशामध्ये आयुर्वेदाची सेवा देणारे ३,००,००० आयुर्वेद वैद्यकीय व्यवसायीं असे अंदाजे ४,७३,००० प्रकृति परीक्षण स्वयंसेवकांच्या माध्यमातून दि. २६.११.२०२४ ते दि. २५.१२.२०२४ या एक महिन्याच्या कालावधीमध्ये अंदाजे एक कोटी कुटुंबांचे 'प्रकृति परीक्षण' करण्यात येईल. सदरील प्रकृति परीक्षणासाठी एक मोबाईल ॲप सुद्धा निर्माण केले आहे. ज्याच्या माध्यमातू संपूर्ण देशभर प्रकृति परीक्षण करणे सोपे जाईल.

सदरच्या प्रकृति परीक्षणामुळे आयुर्वेदाचा प्रचार प्रसार होऊन नवीनत्तम संशोधन होण्यास मदत होईल. तसेच आपले स्वास्थ्य उत्तम राहण्याच्या दृष्टीने आयुर्वेदाचा वापर व त्याची जनजागृती जनसामान्यात होईल. फलस्वरुप आयुर्वेदीय अर्थव्यवस्थेचा विकास होण्यास मदत होईल. यामुळे आयुर्वेद चिकित्सक, आयुर्वेदीय औषध निर्मीती, विक्रेता व औषधी वनस्पती उत्पादन करणारा शेतकरी यांचा विकास सुद्धा त्यामुळे होईल.

याचप्रमाणे या अभियानाच्या अनुषंगाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या माध्यातून खालील पाच विविध विश्व किर्तीमान स्थापित करण्याचा संकल्प आयोजन समितीने केलेला आहे.

1. Most pledges received for a health campaign in one month.
2. Most pledges received for a health campaign in one week.
3. Most pledges received for a health campaign in 24 hours.
4. Largest online photo album of people displaying the digital certificate/largest online photo album of people wearing pin badges.
5. Largest online video album of people saying the same sentence.

यास्तव परिषदेच्या सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींना सूचित करण्यात येते की, सदरील अभियाना अंतर्गत आपले स्वतःचे प्रकृति परीक्षण करण्यात यावे. त्याचप्रमाणे आपल्या रुग्णसेवतून समाजातील जनसामान्यांचे मोठयाप्रमाणावर 'प्रकृति परीक्षण' करावे, जेणेकरुन सदरील अभियानाच्या अनुषंगाने तसेच गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या माध्यमातून संपूर्ण विश्वभर आयुर्वेदाप्रती जनजागृती होऊन आयुर्वेद विकासाची उद्देशपूर्ती साध्य करता येईल.

त्याचप्रमाणे शासकीय सार्वजनिक आरोग्य विभागामधील कार्यरत असणारे वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि परिषदेचे नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी सदरील अभियानाच्या अंतर्गत जे जास्तीत जास्त प्रकृति परीक्षण करतील त्यांना भारतीय चिकित्सा पद्धति राष्ट्रीय आयोग द्वारा निर्देशित केल्याप्रमाणे क्रेडिट पॉईंट दिले जातील. सदर क्रेडिट पॉईंटचा उपयोग त्यांना आपले नोंदणी नूतीनकरण करतांना होईल.

सदरील ॲप डाऊनलोड व त्याच्या माहितीसाठी खालील लिंकचा वापर करण्यात यावा.

Click Here to Download Android Application

**Click Here to Download iOS Application**

How to use Desh ka Prakruti Praikshan App.

आपला

(डॉ. डी. यु. वांगे)

प्रबंधक